“महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद” योजनेअंतर्गत निधी मंजूर करण्याबाबत.

सन २०२६-२७ करिता (लेखाशिर्ष २२१७ ०९१३) अंतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, जि.ठाणे करिता रक्कम रु. ३०.०० कोटी

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक:-मनपा-२०२६/प्र.क्र.१८८/नवि-१६ (ई-१७९३४२८)

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- ०४ नोव्हेंबर, २०२६

संदर्भ :-

(१) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.:-धोरण-२०१७/प्र.क्र.९६/ नवि-१६, दि.१२ डिसेंबर, २०१७, दि. ३० सप्टेंबर, २०२०, दि. २४ एप्रिल, २०२३ व दि. १६ एप्रिल, २०२६.

(२) नगर विकास, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१५/नवि-१६ (ई-९३१९२७), दि. २३ एप्रिल, २०२५.

(३) नगर विकास, शासन निर्णय क्र.मनपा-२०२५/प्र.क्र.१२०(५)/नवि-१६(ई-१११९३४०),दि.२२ ऑगस्ट, २०२५

प्रस्तावना :-

राज्यातील महानगरपालिकांना मुलभुत सोई सुविधांचा विकास करण्याच्या कामांसाठी अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे सुधारीत निकष व मार्गदर्शक तत्वे संदर्भाधीन क्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. संदर्भाधीन क्र.३ अन्वये “कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सावित्रीबाई ज्योतीराव फुले नाट्यगृह विकसित करणे” या कामास रु.१५.०० कोटी निधी मंजूर करण्यात आला असून उर्वरीत कामाकरीता रु.३०.०० कोटी निधी मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

“महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद” या योजनेअंतर्गत **कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, जि.ठाणे करीता रक्कम रु. ३०,००,००,००० /- (अक्षरी रक्कम रु. तीस कोटी मात्र)** इतका निधी **“कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सावित्रीबाई ज्योतीराव फुले नाट्यगृहाचे उर्वरीत काम करणे”** या कामास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर कामांची कार्यान्वयण यंत्रणा **“महानगरपालिका”** राहील.

३. सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहील. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना प्रकल्प खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करुन घ्यावी व संदर्भाधीन क्रमांक (१) येथील शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करावी.

४. सदर शासन निर्णयानुसार प्रत्येक कामाच्या रक्कम रु.१०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीस मान्यता देण्यात आली आहे. सबब, तांत्रिक मान्यता दिलेल्या प्रत्येक कामाच्या रक्कम रु.१०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्तकिमतीच्या प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात यावी. एखाद्या कामाची तांत्रिक मान्यता कमी किंमतीची (रु.१०.०० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे काम) असल्यास सदर कामे एकत्रित करुन प्रशासकीय मान्यता (Package) प्रदान करण्यात यावी. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची (Package) ई-निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम ई-निविदेने करणे बंधनकारक असून, प्रशासकीय मान्यतेच्या (Package) रकमेचे पुनश्च: विलगीकरण (Splitting) करुन कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व:उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करुन घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरुक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

६. संदर्भाधीन क्र.(२) येथील शासन निर्णयान्वये शहरातील विकास कामावरील गुंतवणुकीचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आलेला असून सदर प्राधान्यक्रमाप्रमाणे कामे अनुज्ञेय असल्याची खातरजमा करुन घ्यावी.

७. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निविदा पुस्तिकांचा अंवलंब करणेबाबत शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र. १६/नवि-१६ (ई-९३१९४७) दिनांक २९ एप्रिल, २०२५ अन्वये निर्गमित मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

८. वीज देयकात बचत करण्याकरीता सौर उर्जा प्रकल्प उभारण्यासाठी अर्थसहाय्य करण्याबाबतचे धोरण शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र. १९/नवि-१६ (ई- ९३१९६४) अन्वये निश्चित केले असून सौर उर्जा प्रकल्प उभारतांना सदर मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

९. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

१०. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. प्रत्येक काम किमान रु.१०.०० लक्ष किंमतीचे राहील याची दक्षता घेण्यात यावी.

११. जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करुन दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे व निधी आहरीत करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.अशी बाब असल्यास सदरचा निधी आहरीत करु नये.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर योजनेअंतर्गत करण्यात येणा-या कामांना इतर कोणत्याही योजनेमधून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही अथवा सदरची कामे करण्यात आलेली नाही याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(ग) सध्या सुरु असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे. प्रस्तावित रस्त्यांच्या ठीकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

१२. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरुस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरु करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करुन घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

१३. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थेकडून उपलब्ध करुन घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

१४. सदर शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात येत असलेल्या निधी वितरणाबाबतचे आदेश स्वतंत्रपणे टप्प्या-टप्प्याने निर्गमित करण्यात येतील.

१५. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये"महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासाठी विशेष तरतूद"या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तींची पुर्तता झाल्याची व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात यावी.

१६. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षण / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकाऱ्याने करावी व गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करु नये.

१७. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय, दिनांक २५ ऑगस्ट, २०१५, शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक ६ जून, २००८ व शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-१०.२१/प्र.क्र.६३/अर्थोपाय, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ अन्वये कार्यवाही करावी.

१८. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

१९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६११०४११२६५३९५२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SACHIN DATTATRAY SAHASRABUDDHE
Date: 2026.11.04 11:27:55 +05'30'

(सचिन द. सहस्त्रबुध्दे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

पृष्ठ ५ पैकी ४

२. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा युवक कल्याण व अल्पसंख्याक विकास व औकाफ) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर भवन ७ वा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४.
६. विभागीय आयुक्त, कोकण.
७. जिल्हाधिकारी, ठाणे.
८. आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, जि. ठाणे.
९. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-२, ठाणे.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१४. अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे.
१५. जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.
१६. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. कार्यासन नवि-४, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.